Volume-2 (2021)
Special Issue-1
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. आंबेडकरांची राष्ट्र संकल्पना व काश्मीर प्रश्नाचे परिणाम आणि उपाय योजना

**डॉ. कांबळे गोविंद्राव शंकरराव**
सहयोगी प्राध्यापक
रयत शिक्षण संस्थेचे आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन
सातारा.
9422504086
gskazad44@gmail.com.

**सारांश :-**

भारतीय राजकारणातील सर्वात भीषण प्रश्न हा काश्मीरचा आहे. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरची आता युद्ध वन झाली आहे स्वातंत्र्यापासून त्याचे परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागत आहेत. स्वातंत्र्यापासून अनेक सत्तांतरे झालीत परंतु हा प्रश्न सोडविण्यासाठी कोणीही धाडस केले नाही. दरवर्षी या प्रश्नावर चर्चा केली जाते,. त्यानंतर जैसे थे या अवस्थेतच हा प्रश्न असतो अरुंधती अरुंधती रायलेखिकेने काश्मिर हा भारताचा भाग नाही असे म्हणून वैचारिक क्षेत्रात एक बॉम्ब सोडला त्यामुळे संपूर्ण मीडिया शेत्र हादरून गेले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारत भेटीत या प्रश्नासंबंधी विशेष काही बोलतील अशी राजकीय क्षेत्रातील विद्वत जनांची अपेक्षा होती परंतु त्यांनी ही भारत आणि पाकिस्तान या दोन देशात यावर तोडगा काढावा असा सल्ला देऊन आपले अंग काढून घेतले.काश्मीरचा प्रश्न सोडवण्यासाठी अनेक नेत्यांनी प्रयत्न केलेले आहेत परंतु त्याची सोडवणूक होत नाही या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जो उपाय सांगितला होता तो जर त्या काळच्या नेत्यांनी ऐकला असता तर आज काश्मिरचा प्रश्न नसता काश्मीरचा प्रश्न समजून घेण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी केलेले प्रयत्न, संस्थानिकांच्या प्रश्नासाठी केलेले प्रयत्न, भाषावार प्रांतरचना, भारतीय संविधान, भारतीय संविधानाच्या निर्मितीच्या वेळी केलेली भाषणे, राज्यसभेतील भाषणे याचा अभ्यास करून या प्रश्न मागची मानसिकता लक्षात घ्यावी लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना काश्मीरचा प्रश्न अनेकांगी महत्वाचा वाटत होता म्हणून त्यांनी वेळोवेळी या प्रश्नावर चर्चा केली काही लिखित स्वरूपात तर काही मौखिक स्वरूपात भारताच्या फाळणीचा संदर्भात डॉक्टर आंबेडकरांनी थॉट्स ऑन पाकिस्तान हा मौलिक ग्रंथ लिहून भारतीय स्वातंत्र्याची दिशा दाखविली, तसा प्रयत्न त्यांनी काश्मीर संदर्भात केलेला नाही भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास हा तीन ज्येष्ठ नेत्यांनी भोवती फिरतो ,महात्मा गांधी, बॅरिस्टर जीना आणि आंबेडकर हे तिघेही बॅरिस्टर होते त्यांची भारतीय स्वातंत्र्य संबंधी एकच निष्ठा होती परंतु या देशाच्या स्वातंत्र्यानंतर या देशाच्या सत्तेत आपला काय वाटा राहील या प्रश्नावर तिन्ही नेत्यांचे मतभेद झाले बाबासाहेब आंबेडकरांनी 11 ऑक्टोबर 1951 रोजी विधी मंत्रिपदाचा राजीनामा देताना परराष्ट्रीय धोरण आणि काश्मीर प्रश्नी जी भूमिका विशद केली होती ती काश्मीर प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी अतिशय मार्गदर्शक स्वरूपाची आहे त्यांच्या मते काश्मीरची फाळणी करावी आणि हिंदू बौद्ध भाग भारताला जोडावा आणि मुस्लीम भाग पाकिस्तानला जोडावा काश्मीरच्या संरक्षणासाठी सैन्यावर खर्च करणे भारताला परवडण्यासारखे नाही हे त्यांनी राज्यकर्त्यांच्या निदर्शनास आणून दिले होतेयावरून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी 370 व्या कलमाचा वर

प्रत्यक्षात भाष्य केले नसले तरी त्यांचा 370 व्या कलमाला विरोध असावा असे वाटते काश्मीरचा प्रश्न हा हिंदू मुस्लिमांचा संघर्ष असल्याचे चित्र उभे केले जाते. काश्मीर मध्ये एक तिसरी शक्ती आहे हे बाबासाहेब आंबेडकरांनी उद्धृत केले. काश्मीरची जनताही भारताला आपला देश समजत नाही त्यांना काश्मीर हा स्वतःचा देश वाटतो काश्मीरचा प्रश्न हा बहुतांशी राजकीय गुंतागुंतीचा असल्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशाचे असीम नुकसान होत आहे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेत गेल्या 50 वर्षापासून विपरीत परिणाम होत आहेत याचा विचार करून मोदी सरकारने 5 ऑगस्ट 2019 रोजी भारतीय राज्यघटनेतील कलम 370 आणि 35 अ रद्द करून जम्मू काश्मीर आणि लडाख अशा दोन प्रांताचे रूपांतर केंद्रशासित प्रदेशांमध्ये केल्यानंतर केवळ भारतात नव्हे तर संपूर्ण विश्वातच खळबळ उडाली होती. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे पडसाद केवळ भारतभरातून नव्हे तर जगभरातून आजही विविध माध्यमातून उमटत आहेत. भारताच्या स्वातंत्र्यापासून म्हणजे 1947 पासून गेली बहात्तर वर्षे अधांतरी लटकत राहिलेला काश्मीरचा प्रश्न केंद्र सरकारने आपल्या प्रबळ राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर तडकाफडकी निर्णय घेऊन मार्गी लावला.

**प्रस्तावना: –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे मानवी कल्याणाच्या विचाराचा महा ग्रंथच ते जागतिक कीर्तीचे राजकीय तत्वज्ञ होते. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास काही मोजक्या व्यक्तींना समोर ठेवून लिहिण्यात आला आणि डॉ. आंबेडकरांची व्यक्तिरेखा त्यामध्ये राष्ट्रद्रोही स्वरूपाची चित्रित करण्यात आली. त्यामुळे त्यांच्या राजकीय विचारांकडे अनेकांचे दुर्लक्ष झालेले दिसते. काही लोक डॉ. आंबेडकरांना समाज सुधारक म्हणून आधि मान्य  करण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांच्या क्रांती दर्शी राजकीय तत्वज्ञानाला अंधारात दडपून टाकण्याचा प्रयत्न करतात . डॉ. आंबेडकरांचे जीवन कार्य आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा निरपेक्ष दृष्टिकोनातून विचार केल्या त्यांचे राजकीय क्षितीज आणि तत्वज्ञानाचा विश्वात्मक दर्जा इतिहासालाही मान्य करावा लागेल डॉ. आंबेडकरांचे राजकीय आकाशच राष्ट्रीय तत्वांनी व्यापलेले होते. त्यामध्ये कुठेही संकुचित विचारांना स्थान नाही. प्रत्येक प्रश्नाचा विचार त्यांनी जागतिक स्तर आणि राष्ट्रीय मूल्यांच्या मातृ कोषातूनच केला आहे. त्यांची विचार भूमी ही राष्ट्रीयच आहे . राष्ट्रीयतेच्या परीघात एकूणच त्यांच्या प्रत्येक विचारांची निर्मिती झाली. मग तो विचार सामाजिक असो, धार्मिक असो, आर्थिक वा राजकीय असो आर्थिक वा राजकीय असो प्रत्येक विचाराचा रंग त्यांनी राष्ट्रीयतेचाच धारण केलेला दिसतो त्यांच्या राजकीय विचारावर जागतिक कीर्तीच्या जॉन लॉक, जेफरसन, जॉन डी वे, एडमंड बर्क, आणि पश्चिमी उदारमतवादी विचारवंतांच्या राजकीय आणि सामाजिक सिद्धांताचा गडद प्रभाव असला तरी आपल्या प्रज्ञा शक्तीने या विचाराच्या रस्त्यातून त्यांनी स्वतंत्र राजकीय तत्त्वज्ञानाची निर्मिती केली हेही तितकेच सत्य म्हणून त्यांचे राजकीय तत्वज्ञान या देशातील राजकारणाचा सुक्षम पाया ठरावा.

आंतरराष्ट्रीय राजकारणात विदेश नीति महत्त्वपूर्ण असते कोणत्या देशासोबत कसे संबंध असले पाहिजेत हे विदेश नीती ठरवते 1945 ला दुसरे महायुद्ध संपले आणि वेगवेगळे देश दोन गटात विभागले गेले एक गट अमेरिकेचा आणि दुसरा गट रशियाचा 1947 ला इंग्रज निघून गेले आणि भारताची सत्ता काँग्रेसच्या हातामध्ये आली, पंडित नेहरू यांनी दोन्ही गटात न जाता अलिप्ततावाद स्वीकारला यालाच अलिप्तवादी धोरण म्हटले गेले, परंतु बाबासाहेब आंबेडकर अलिप्त राहण्याच्या विरोधात होते, त्यांनी म्हटली की जर उद्या चींनने आपल्यावर आक्रमण केले तर रशिया मदतीला येणार नाही कारण तो त्या गटाचा भाग आहे आणि अमेरिका सुद्धा मदतीला येणार नाही कारण

आपण त्या गटात नाहीत. आणि बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय भविष्य खरे ठरले, नंतर खरंच चीनने भारतावर आक्रमण केले आणि आपल्या देशाचा काही भाग गिळंकृत केला. आपल्या बाजूने रशिया, अमेरिका कोणताच देश आला नाही.

**काश्मीर प्रश्नाची पार्श्वभूमी :-**

इंग्रजांनी भारत सोडून जाताना संस्थानिकांसाठी (राजे, रजवाडे) तीन पर्याय ठेवले होते.

(१) ते भारत देशात सहभागी होऊ शकतात.

(२) ते पाकिस्तान देशात सहभागी होऊ शकतात.

(३) ते स्वतंत्र देश म्हणून सुद्धा राहू शकतात

हैदराबाद संस्थान अर्थात निजाम आणि कश्मीर चा राजा हरिसिंग वगळता सर्व संस्थानिक भारत किंवा पाकिस्तान देशात सहभागी झाले होते. त्या काळातील काँग्रेस सरकारने हैदराबाद संस्थान पोलीस ऍक्शन च्या नावाखाली अर्थात मिल्ट्री पाठवून हैदराबाद संस्थान ताब्यात घेतले आणि समर्थन असे केले की हैदराबाद संस्थान मध्ये प्रजा हिंदू आहे आणि राजा मुसलमान आहे आणि प्रजेची मागणी आहे की त्यांना भारत देशात सहभागी व्हायचे आहे. पाकिस्तानने सुद्धा कश्मीर वर हल्ला केला आणि हाच तर्क दिला की कश्मीर ची जनता मुसलमान आहे आणि राजा हिंदू आहे मुसलमान लोकांची मागणी आहे की त्यांना पाकिस्तान मध्ये सहभागी व्हायचे आहे काश्मीरचा राजा हरिसिंग कश्मीर स्वतंत्र देश ठेवू इच्छित होता ठेवू इच्छित होता त्यामुळे तो भारत किंवा पाकिस्तान मध्ये सहभागी झाला नव्हता. पाकिस्तान कडून पराभव होऊ शकतो म्हणून मजबुरी मध्ये त्याने भारताची मदत मागितली परंतु पंडित नेहरूंनी अट घातली तुम्ही भारतात जर सहभागी होत असाल तर आम्ही मदत करू आणि राजा हरिसिंग यासाठी तयार झाले आणि आणि संविधानातील आर्टिकल 370 बनले. .

**गरज व महत्त्व :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची काश्मीर प्रश्नाविषयी ची दृष्टी अगदी स्वच्छ होती. ऑस्ट्रीया, झेको स्लोव्हाकिया इत्यादी देशात जे घडले त्याची पुनरावृत्ती या देशात होऊ नये यासाठी मुसलमानांना त्यांच्या इच्छेविरुद्ध एखाद्या राज्यात उंबर्था येणार नाही हे डॉ. आंबेडकरांचे भाकित खरे ठरले. सर्व मुसलमान पाकिस्तान साठी झगडेले आणि त्यांनी आपले स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले. त्याच फाळणीचा काश्मीर हा अखेरचा भाग आहे, असे परखडपणे डॉ. आंबेडकरांनी आपले मत व्यक्त केले होते. काश्मीरचा प्रश्न कसा सोडवावा यासाठी त्यांनी वेळोवेळी सूचना दिल्या परंतु त्याकडे सत्तांध आणि धर्मांध नेत्यांनी सहेतुक दुर्लक्ष केले काश्मीरच्या प्रश्नाला गंभीर वळण दिले. आजही हा प्रश्न तसाच धगधगत आहे आणि काश्मीर चे नंदनवन अतिरेक्यांचे युद्ध वन झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेकदा अनेक सुसंगत उपाय सुचविले. परंतु नेहरू सरकारने त्याकडे दुर्लक्ष करून हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा केला. 1947 मध्ये टोळीवाल्यांच्या मदतीने पाकिस्तानने जेव्हा जम्मू-काश्मीरवर भारतात सम्मिलित करण्याची डॉ. आंबेडकरांची योजना होती. परंतु तेथेही नेहरूंनी आडकाठी आणली आणि युद्ध विराम दिला. त्यामुळे अर्धा काश्मीर चा भाग पाकिस्तानच्या घशात पडदा. भारताने हा प्रश्न युनोत नेऊ नये अशी सूचना डॉ. आंबेडकरांनी पंतप्रधान नेहरूना केली होती त्याकडे दुर्लक्ष करून नेहरू हा प्रश्न यूनोत घेऊन गेले आणि तो अधिक जटिल झाला युनोत भारत आपली बाजू मांडत होता त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी काश्मीरच्या फाळणीची महत्त्वपूर्ण सूचना केली होती त्यावरही अनेकांनी टिकेचा प्रहार केला युनो कडून

कडून हा प्रश्न सुटणार नाही उलट तो अधिक गुंतागुंतीचा होईल असे डॉ . आंबेडकरांनी भाकीत केले होते ते खरेच ठरले जम्मू काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे आणि काश्मीरच्या महाराजांनी ऐन आणीबाणीच्या वेळी भारताकडे सामील नाम्याच्या आश्वासनावर मदत मागितली होती आणि भारताने मदत देऊन काश्मीरच्या स्वातंत्र्याचे रक्षण केलेले आहे काश्मीर प्रांताच्या सामील नाम्याचा प्रश्न सरळ आणि सुलभ असताना आमच्या सरकारने युनोकडे तक्रार घेऊन जाऊ नये पाकिस्तानने तशी तक्रार केली तरी चालेल असा स्पष्ट इशारा डॉ आंबेडकरांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकार्यांना दिला होता तरीही पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी तो प्रश्न युनोकडे नेलाच. त्यावेळी योग्य सल्ला न ऐकल्यामुळे आजही जम्मू-काश्मीरच्या प्रश्नाचे घोंगडे भिजत पडले आहे काश्मीरच्या प्रश्नाचा विचार करताना आपणा स्पष्टपणे दिसेल की, नेहरूंचा बौद्धिक पलायनवाद आणि बौद्धिक कसरती मुळे काश्मीरच्या प्रश्नाचा बट्ट्याबोळ झाला आहे 1947 पासून तर आत्तापर्यंत कोट्यवधी रुपयांचा चुराडा संरक्षणाच्या नावावर भारत करीत आहे. डॉ. आंबेडकरांचा सल्ला नेहरू सरकारने त्यावेळी मान्य केला असता तर काश्मीरचा प्रश्न कधीचाच सुटला असता आणि दरवर्षी आरक्षणाच्या नावावर होणारा कोट्यावधी रुपयांचा खर्च कल्याणकारी योजनेत लावता आला असता . 5 ऑगस्ट 2019 रोजी भारतीय राज्य घटनेतील कलम 370 आणि 35 (अ) रद्द करून जम्मू व काश्मीर आणि लडाख अश्या दोन प्रांताचे रूपांतर केंद्रशासित प्रदेशांमध्ये केल्यानंतर केवळ भारतात नव्हे तर संपूर्ण विश्वातच खळबळ उडाली होती केंद्र सरकारच्या या निर्णयाचे पडसाद केवळ भारतभरातून नव्हे तर जगभरातून आजही विविध माध्यमातून होत आहेत भारताच्या स्वातंत्र्यापासून म्हणजे1947 पासून गेली बहात्तर वर्षे अधांतरी लटकत राहिलेला काश्मीरचा प्रश्न केंद्र सरकारने आपल्या प्रबळ राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर तडकाफडकी निर्णय घेऊन मार्गी लावला 31 ऑक्टोबर 2019 रोजी जम्मू आणि कश्मीर व लडाख या दोन स्वतंत्र प्रदेशांना केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला आणि कलम 370 आणि काश्मीर यांचा ऋणानुबंध कायमचा इतिहासात जमा केला.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. डॉ. आंबेडकरांची राष्ट्र संकल्पनेची भूमिका समजावून घेणे.
2. काश्मीरच्या संस्थानिकांची भूमिका विचारात घेणे.
3. डॉ. आंबेडकरांच्या मते मुस्लीम मानसिकतेचे आकलन समजून घेणे.
4. काश्मीर येथील राज्यकर्त्यांची भूमिका विचारात घेणे.
5. काश्मीरच्या स्वायत्त ते बाबतची मते जाणून घेणे.
6. पंडित जवाहरलाल नेहरू च्या परराष्ट्रीय धोरणाचा अभ्यास करणे.
7. डॉ. आंबेडकरांनी सुचविलेल्या उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे.

**संकल्पनात्मक व्याख्या**

राष्ट्र या शब्दाचा ढोबळ अर्थ --एका भूभागावर राहणाऱ्या व संयुक्त सरकार असणाऱ्या व्यक्तींचा मोठा समूह असा होतो.

राष्ट्र म्हणजे सामाजिक , सांस्कृतिक आणि राजकीय अस्तित्व असलेल्या आणि त्यायोगे आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या लोकांचा एक समुदाय. जन्माने किंवा वंशाने एक असलेला जनसमूह म्हणजे राष्ट्र.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्र संकल्पनेची व्याख्या –**

राष्ट्र म्हणजे अनेक वर्गाचा समूह नव्हे. राष्ट्रीय स्वतंत्र तेला वास्तविक रूप द्यायचे असेल तर, त्या देशातील विभिन्न वर्गाचे स्वातंत्र्य ठेवणे आवश्यक आहे. मुख्यतः आज जे लोक निर्धन, पीडित, अस्पृश्य आहेत त्यांच्या स्वातंत्र्याला अग्रक्रम दिला पाहिजे. डॉक्टर आंबेडकरांनी राष्ट्र संकल्पनेचा केवळ तत्त्वज्ञानात्मक पातळीवरच विचार केला नाही ,तर सामाजिक पातळीवरही तितकाच विचार केला आहे त्यामुळे भारत देश एक राष्ट्र आहे या म्हणण्याला त्यांनी तत्वतः हा विरोध केला तात्विक पातळीवर भारताला एक राष्ट्र मानता येईल परंतु सामाजिक दृष्टीने असा विचार करता येणे शक्य नाही असा त्यांनी विचार दिला. संशोधन पद्धती- प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धती चा उपयोग केला आहे. .

**संशोधनाची साधने-**

मतावली, छापील साहित्य नियतकालिक, वर्तमानपत्र, पुस्तके, इंटरनेट इत्यादी.

**डॉ. आंबेडकरांची राष्ट्र संकल्पना -**

डॉ. आंबेडकरांच्या राजकारणाला राष्ट्र संकल्पनेचा मौलिक आधार आहे त्यांचा राष्ट्रवाद सिडने ,ब्रुक्स, नॉर्मन इंजील किंवा रोबर्टसन यांनी जसे राष्ट्रवादाला मानवीय शत्रु संबोधले तशा प्रकारचा नव्हता तर मानवी कल्याणासाठी राष्ट्रवाद उपयुक्त शक्ती असल्याची मान्यता डॉक्टर आंबेडकर यांनी दिली . धर्मांधतेवर अधिष्ठित हिंदू किंवा मुस्लिम राष्ट्रवाद त्यांना अजिबात मान्य नव्हता. ब्रिटीशांचा साम्राज्यवाद ही त्यांना मान्य नव्हता. अशा धर्मांध आणि साम्राज्यवादी राष्ट्रवादाला त्यांनी स्पष्ट नकार दिला. राजकीय विचारांच्या आधारे राष्ट्रवादासाठी त्यांनी मुख्यतः दोन गोष्टीचे प्रतिपादन केले एक राष्ट्रवादाचा मौलिकआधार सामाजिक एकतेची दृढ भावना असावयास पाहिजे. दोन आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राष्ट्रवादाचा आधार मानवी प्रगती आणि मानवी कल्याण असावयास पाहिजे.

कोणत्याही राष्ट्रातील लोकांच्या अंतरिक एकतेचे दर्शन हाच राष्ट्रवाद असल्याचे बाबासाहेब आंबेडकर मान्य करतात दुर्भाग्याने भारतात राष्ट्रवादाचा सिद्धांत अशाप्रकारे तयार करण्यात आला की बहुसंख्यांक लोकांना शासन करण्याचा दैवी अधिकार प्राप्त झाला आहे ते आपल्या इच्छेनुसार राष्ट्रीय भावनेचे निर्णय घेत असतात आणि बहुसंख्यांक लोकांद्वारे ाजकीय किंवा सरकारी शक्तीचा एकाधिकार करणे यालाच ते राष्ट्रवाद म्हणतात आंबेडकरांचा राष्ट्रवादी विचार बहुसंख्यांक अल्पसंख्यांक या संकुचित विचारापेक्षा अगदी वरच्या थराचा आहे हा राष्ट्रवाद निसंदेह मानवी समाज संलग्न आहे तत्वता अध्यात्मिक समरूप होणारा आहे राजकीय स्वतंत्रता, सांस्कृतिक एकता आणि सामाजिक दृढता यावर आधारित यांची राष्ट्र संकल्पना आहे त्यांच्या राष्ट्र संकल्पनेत व्यक्ती पूजेला स्थान नाही भाषा प्रदेशाचे बंधन नाही त्यांचा राष्ट्रवाद वैज्ञानिक व बुद्धिनिष्ठा आहे त्यात भारताच्या प्राचीन इतिहासाची केवळ पुनरावृत्ती नाही तर नव्या मूल्यांवर अधिष्ठित विचारांचा स्वीकार करण्याचीही सोय आहे बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय संकल्पनेत स्वतंत्र तेला अधिक महत्त्व आहे कोणत्याही देशात राहणाऱ्या जनतेच्या स्वतंत्रते शिवाय स्वतंत्रते शिवाय त्या देशाचे स्वातंत्र्य अपूर्ण आहे असे त्यांचे मत होते देशाच्या स्वातंत्र्य सोबत देशाची एकता सुद्धा तितकीच महत्त्वपूर्ण असल्याचे बाबासाहेबांनी प्रतिपादन केले आहे 17 डिसेंबर 1946 रोजी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात -मला या देशाच्या भावी सामाजिक, राजकीय आर्थिक विकासाच्या रचनेने संबंधी किंचितही शंका नाही मला माहित आहे की, आपण राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने विभाजित आहोत आपण पृथक पृथक घटकात असलो आणि मी सुद्धा एक पृथक घटकात असलो तरी मला

पूर्ण विश्वास आहे की योग्य वेळ योग्य परिस्थिती आल्यास हा देश एक होण्यास जगातील कोणतीही शक्ती परावृत्त करू शकणार नाही आपण विभिन्न धर्म आणि जातीचे असलो तरी आपण एक दिवस निश्चितच संघटित होऊन असे म्हणण्यास मला अजिबात संकोच वाटत नाही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेली राष्ट्र संकल्पना ही विज्ञाननिष्ठ आणि लोकशाही सिद्धांताचे परिपोषण करणारी आहे याच संकल्पनेच्या आधारे काश्मीरच्या प्रश्नाचा विचार करण्याची आज गरज आहे काश्मीर मध्ये विविध संप्रदायाचे लोक राहतात त्यामुळे काश्मीर ला बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार राष्ट्र संबोधने ही चूक आहे काश्मीर मुक्ती संबंधी तेथील वास्तविक निवासी फारशी मागणी करताना दिसत नाही पाकिस्तान आणि भारत यांच्या राजकीय सत्तास्पर्धेत हा प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक चिघला जात आहे काश्मीर मुक्ती संबंधी धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून विचार झाला असता तर एकदाचे मान्य करता आले असते.

काश्मीरच्या प्रश्नाची मुळे भारतीय संस्थानिकांच्या इतिहासात दडलेली आहेत 1765 मध्ये रॉबर्ट क्लाइव्ह च्या नेतृत्वाखाली ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता भारतात दृढमूल झाली. कंपनीच्या राज्य विस्ताराच्या धोरणातून 1858 पर्यंत जी ऐतदेशिय राज्ये बचावली , त्यांना भारतीय संस्थाने असे म्हणतात. एकोणिसाव्या शतकात वारेन हेस्टिंग्ज, रीचर्ड वेलस्ली , जेम्स डबल हाऊसिंग या गव्हर्नर जनरल चा कंपनीच्या कार्यात मुख्य भाग होता तह व करार नामे सुरुवातीला कंपनीने मित्रत्व आणि समानता या भूमिकेतून केले, पण एकोणिसाव्या शतकापासून त्याजागी ब्रिटिश सार्वभौमत्वाने जागा घेतली. त्याला कायद्याचा कोणताच आधार नव्हता. भारत हा ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग बनला अठराशे सत्तावनचा उठावा नंतर संस्थानिकांची नांगी मोडून त्यांचा योग्य वापर करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला कंपनीचे व ब्रिटिश सरकारचे अनेक गव्हर्नर आणि गव्हर्नर जनरल हे उमराव आणि मोठ्या घराण्यातील अच् असल्यामुळे भारतातील अनेक संस्थानिकां बद्दल त्यांना हाथवे चा वाटत होती. अठराशे सत्तावनचा उठावानंतर ब्रिटिशांनी संस्थानिकांना विशिष्ट दर्जा देण्याचा प्रयत्न केला. राणी व्हिक्टोरिया ने 1858 च्या जाहीरनाम्यात यापुढे राज्यविस्तार न करण्याचे कंपनीने केलेले सर्व तरणामे करारनामे पाळण्याचे आणि संस्थानिकांचे सर्व हक्क कायम ठेवण्याचे वचन दिले. तांत्रिक दृष्ट्या अनियंत्रित राज्यसत्ता हेच सर्व संस्थानांचे वैशिष्ट्य होते प्रत्यक्षात ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांचे त्यावर नियंत्रण असे हे नियंत्रण करण्याचे कार्य ब्रिटिश राजकीय विभाग ठरवी. १८५८ नंतर राज्य विस्तार थांबला. भारतातील स्वातंत्र्याची चळवळ विसाव्या शतकात जोर धरू लागली तशी संस्थानी प्रजेला सुद्धा स्वतःच्या हक्काची जाणीव होऊ लागली त्याबरोबर ब्रिटिश धोरणही बदलू लागले इंग्रजांनी संस्थानिकांचा उपयोग ब्रिटिश भारतातील स्वातंत्र्याची चळवळ दडपण्यासाठी सुरू केला वेठबिगार, स्थानिक जुलूम व अन्याय याविरुद्ध काही संस्थानातून चळवळींना प्रारंभ झाला. परंतु संस्थानिकांनी त्या चळवळींना दडपण्याचा प्रयत्न केला. 3 जून 1947 रोजी व्हॉइस राय लॉर्ड लुई माऊंटबॅटने इंग्रज भारत सोडणार हे जाहीर केले. संस्थानाचा एकुणच प्रश्न सोडविण्यासाठी मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्री सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या हाताखाली संस्थानी खाते निर्माण झाले. महाराजा हरिसिंग त्याकाळी काश्मीरचा संस्थानिक होता तो अतिशय जातीय प्रवृत्तीचा कडवा संस्थानिक म्हणून गाजला. त्याने केलेल्या अत्याचाराची शिकार बहुसंख्य मुसलमान तर होतेच परंतु काश्मिरी पंडितांना ही त्यांनी सोडले नाही त्यांच्या डोग्रा योजनेनुसार त्यांनी राजपूत लोकांनाच प्रशासनात 60 टक्के जागा दिल्या. डॉक्टर आंबेडकरांनी दिलेल्या राजीनामा पत्रात परराष्ट्रीय धोरण आणि काश्मीरच्या प्रश्नांसंबंधी जी भूमिका मांडली होती ती अतिशय महत्त्वपूर्ण आहे आंबेडकर म्हणतात ज्या तिसऱ्या गोष्टीबद्दल मला केवळ समाधान वाटते ती गोष्ट म्हणजे परराष्ट्रीय धोरण 15 ऑगस्ट 1947 रोजी आमचे वाईट चिंतणारा एकही देश नव्हता आता चार वर्षांनंतर आमचे

सगळे मित्र आम्हाला सोडून गेले आहेत आम्हाला कोणीच मित्र उरलेला नाही आमच्या 350 कोटी उत्पन्नापैकी 180 कोटी रुपये सैन्यासाठी खर्च होतात आमच्या परराष्ट्रीय धोरणाचे हे फळ आहे आम्हाला संरक्षणासाठी आमच्याच पायावर उभे राहावे लागते कारण आणीबाणीच्या प्रसंगी ज्याच्यावर विसंबता येईल असा मित्रच आम्हाला नाही भारत-पाक संस्थाबद्दल डॉक्टर आंबेडकर म्हणाले की काश्मीर व पूर्व बंगालमधील आपल्या लोकांची स्थिती यामुळे हे संबंध बिघडलेले आहेत मला वाटते पूर्व बंगाल बद्दल आपण अधिक काळजी घेतली पाहिजे सर्व वृत्तपत्रांवर होऊन तेथील आपल्या लोकांची परिस्थिती असह्य आहे असे म्हणावे लागते. नेहरूच्या परराष्ट्रीय धोरणात भोंगळपणा आहे अव्यवहार्य व स्वप्नाळू तत्त्वनिष्ठा आहे, देशाच्या आजच्या प्राथमिक अवस्थेला न मानवणारे व अनेक शत्रू निर्माण करणारे ते धोरण आहे. नेहरूंना स्वतंत्र वृत्तीने वागावयास तेव्हाच मिळेल की ज्यावेळी हा देश सामर्थ्यवान व स्वावलंबी होईल आंबेडकरांच्या व्यवहारी बुद्धीला हे धोरण पटू नये यात आश्चर्य वाटण्यासारखे मुळीच नाही . नेहरूंचे भारत-पाक संबंधात असलेले धोरण असेच कमजोर व तत्त्वशून्य आहे काश्मीरचा प्रश्न हा युनो कडे नेण्यात जी भयंकर चूक झाली त्याचे परिणाम आज देशातील प्रत्येक नागरिकाला आर्थिक दृष्ट्या भोगावे लागत आहेत. काश्मीर मध्ये आणखी काही आठवणी युद्ध चालू ठेवले असते तर तो सर्व प्रदेश ताब्यात आला असता. काश्मीर ची फाळणी करणे हा एकच उपाय काश्मीरचा प्रश्न सोडवू शकेल असे त्या जाहीरनाम्यात सुचवलेले आहे काश्मीरच्या प्रश्नामुळे भारताला दरसाल 20 कोटी रुपये खर्चावे लागतात हा प्रश्न अस्तित्वात नसता तर ही मोठी रक्कम समाज प्रगतीच्या कार्यासाठी खर्च करता आली असती पंडित नेहरूंनी विचित्र परराष्ट्रीय धोरण स्वीकारून भारताचे प्रदेश मित्र दूर लोटले. बाबासाहेबांच्या मते काश्मीर हा संघराज्य नसून ते एक संमिश्र राज्य आहे त्यामध्ये हिंदू, बौद्ध आणि मुस्लिमांचा अंतर्भाव आहे

**काश्मीर प्रश्नाचे परिणाम :-**

1. लाहोर करारामुळे मुस्लिम मानसिकतेत बदल झाला.
2. काश्मीर प्रश्न गुंतागुंतीचा असल्याने भारत आणि पाक दोन्ही देशाचे अतोनात नुकसान होत आहे.
3. भारत आणि पाक दोन्ही देशाच्या अर्थव्यवस्थेवर गेली 45 वर्षे विपरित परिणाम होत आहे.
4. पाकिस्तानचा 30 टक्के व भारताचा अठरा टक्के खर्च संरक्षणावर होत आहे.
5. हजारो निष्पाप नागरिकांचा बळी जात आहे.
6. हजारो सुरक्षारक्षकांना जीव गमवावा लागला आहे.
7. दहशतीखाली जीवन जगावे लागत आहे.
8. वैचारिक स्वातंत्र्य नाही.
9. उद्योगधंदे स्थापन करण्याची परवानगी नाही.
10. स्थलांतर करण्याची परवानगी नाही.
11. रोजगार निर्मिती क्षमता असून देखील रोजगार निर्माण करण्यास बंदी.
12. जमीन खरेदी विक्री बंदी.
13. पंडित नेहरूंच्या भोंगळ राष्ट्रीय धोरणामुळे प्रश्न अधिकच जटिल झाला.
14. संस्थानिकांच्या कडव्या विरोधा मुळे प्रश्न अनेक दिवस भिजत राहिला आहे.
15. 1988 पासून पाक प्रशिक्षित बंडखोरांनी अनेक घातपात घडवून आणले आहेत .

**निष्कर्ष :-**

1. काश्मीर प्रश्न सुटण्यासाठी हिंदू-मुस्लीम दलित बौद्ध यांच्या एकतेची गरज आहे.
2. बाबासाहेब आंबेडकरांच्या मताप्रमाणे लोकसंख्येची शांततापूर्वक अदलाबदल झाली नाही.
3. संरक्षण खर्च कमी करून कल्याणकारी योजना राबवता आली नाही.
4. सिमला करार आणि प्रश्नांची सोडवणूक झाली असती.
5. महार सैनिकांनी घडवलेल्या इतिहासाची नव्याने मांडणी करणे आवश्यक आहे.
6. काश्मीर ची फाळणी इंग्रजांच्या नीतीमुळे झाली नसून हिंदू सांप्रदायिक नीतीमुळे झाली आहे.
7. काश्मीर खोऱ्यातील तरुणांचे पुनर्वसन करावे.
8. काश्मीर प्रांतातील मुस्लिम मानसिकतेत बदल घडवून आणणे.
9. भारत अखंड राहिला असता तर हिंदूंना मुसलमानाच्या दयेवर जगावे लागले असते.

**उपाय योजना :-**

1. काश्मीर मधील भारतविरोधी कारवायांचा कठोरतेने बिमोड करणे.
2. घटनेचे 370 कलम रद्द करणे.
3. काश्मीरचे विभाजन करणे .
4. सीमेलगतच्या भागात सेवानिवृत्त सैनिकांना प्रयत्नपूर्वक बसविणे
5. देशाच्या अन्य भागात सुरु असलेल्या देशद्रोही कारस्थानांचा नायनाट करणे.
6. देशातील मुसलमानांना योग्य समज देणे.
7. राजकीय प्रक्रिया सुरू करण्याबरोबर काश्मिरात मानवी हक्काचे संगोपन करणे.
8. अतिरेक्यांना मिळणारे विदेशी समर्थन पूर्ण पणे थांबविणे.
9. काश्मीरमधील सुरक्षा दलाची संख्या वाढविणे.
10. सुरक्षा दलाकडून मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही त्यासाठी नियंत्रण ठेवले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. डॉ.धनराज डहाट (सुधारित आवृत्ती 2017) डॉ .आंबेडकर आणि काश्मीर समस्या , संकेत प्रकाशन, नागपूर.
2. प्रा.शेषराव मोरे काश्मीर एक शापित नंदनवन.
3. चा.भ.खैरमोडे भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड अकरा, म. रा. साहित्य मंडळ, मुंबई.
4. य .दि .फडके महात्मा फुले समग्र वांग्मय, म. रा. साहित्य मंडळ मुंबई.
5. वर्तमानपत्रे - तरुण भारत मुंबई सहा डिसेंबर 2017
6. लोकसत्ता 5 ऑगस्ट 2019 .
7. www.mahamtb.com.
8. http:// Maharashtra Times.com